# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**Savitribai Phule Pune University**

(formerly University of Pune)

## प्रकटन

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (२८)(२)(न)[(28(2)(t)] अन्वये नोंदणीकृत पदवीधरांमधून विद्यापीठाच्या अधिसभेवर १० नोंदणीकृत पदवीधरांना निवडून देण्यासाठी संदर्भ क्र. साफुपुविनि/२८(न)/१५७ दि. २४.१०.२०१७ अन्वये निवडणूक सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

तसेच महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम (२८)(२)(त)[(28(2)(p)] अन्वये विद्यापीठाच्या अधिसभेवर संलग्न महाविद्यालय, मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या ६ व्यवस्थापनाचे प्रतिनिधी निवडून देण्यासाठी संदर्भ क्र. साफुपुविनि/२८(त)/१५८ दि. २४.१०.२०१७ नुसार निवडणूक सूचना विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली होती.

उपरोक्त निवडणूक सूचनेनुसार नोंदणीकृत पदवीधर व व्यवस्थापन प्रतिनिधी यांची सदस्य, अधिसभा या पदाची निवडणूक रविवार, दिनांक १९ नोव्हेंबर, २०१७ रोजी घेण्यात आली. या निवडणूक सूचनेमध्ये मतपत्रिकांची छाननी व मतमोजणी विद्यापीठ परिसरात दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी, सकाळी ८.०० वाजता पासून होणार आहे, असे नमूद केले होते.

तरी सर्व संबंधितांना या प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, सदर निवडणुकीच्या मतपत्रिकांची छाननी व मतमोजणी दिनांक २७ नोव्हेंबर, २०१७ रोजी, सकाळी ८.०० वा. पासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुख्य इमारतीमध्ये होणार आहे, याची नोंद घ्यावी.

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/263
दिनांक : 23/११/२०१७

24/11/17
(डॉ. अरविंद दि. शाळिग्राम)
प्रभारी कुलसचिव

प्रत : सर्व संबंधित उमेदवार.

D:\Election 2017\Nondanikrut Padvidhar(Registered Graduates)\Prakatan\Prakatan.docx